# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २९/१२/२००३

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक २९/१२/२००३ रोजी सभा सुचना क्र. २७ दि. २४/१२/२००३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### <u>उपस्थित सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ४) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ५) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ६) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ९) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ११) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

### <u>गैरहजर सदस्य</u>

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ४) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ५) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९० चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, सर्वप्रथम येणारे वर्ष आपल्याला सुख-समृद्धीचे जावे अशी आपल्याला शुभेच्छा देतो आणि आपल्या ह्या चांगल्या सणामध्ये आपण आम्हालाही समाविष्ट करून घ्याल अशी अपेक्षा बाळगतो. आज या ठिकाणी घनकचरा प्रकल्प व्हावा अशी धारणा आपल्या सर्व सन्मा. सदस्यांची आहे.

**रिटा शाह :-**

मोहन पाटील साहेब, एक मिनिट आपण सभेच्या सुरूवातीला पत्राचे वाचन केले नाही. साहेब, मी पत्र टाकलेले आहे व ते आपल्या नावावरच टाकलेले आहे. ते पत्र टाकलेले आहे ते महत्त्वाचे आहे म्हणून बोलत आहे. कारण मागच्या सभेला अनधिकृत बांधकामाबद्दल मॉरसजी रॉड्रीक्स सभापती ह्यांनी डिसीजन दिल्यानंतर सभा संपायच्या दोन मिनिट अगोदर उपसुचना येते ती उपसुचना कायदेशीर

इनक्लूड होते का? तो विषय संपला त्याच्यावर डिसीजन झाले आणि डिसीजन झाल्यानंतर आपण कसे बदलणार ते. सभापती साहेबांचे डिसीजन झाल्यानंतर त्यांच्यामध्ये उपसुचना नसते. मग ती उपसुचना घ्यायची नाही अशी माझी सुचना आहे व असे मी पत्र ही टाकलेले आहे आणि ते प्रोसिडिंगमध्ये यायला नाही पाहिजे. अध्यक्ष महोदयांनी तेव्हा डिसीजन दिले की, पुढच्या सभेपासून दहा वाजता प्रत्येक स्थायी समितीच्या सभेला जेवढे महापालिकेचे वकील आहेत त्यांना बोलावून सभा घ्यायची. असा निर्णय त्यांनी दिला आणि आले नाहीतर त्यांना काढून टाकू असे ते बोलले ठिक आहे. पण त्यांना काढून टाकण्याचा आमचा अधिकार नाही आहे आणि त्यांचा ही अधिकार नाही आहे. पण स्थायी समितीला अधिकार आहे. त्यांच्या एकट्याला अधिकार नाही आहे. स्थायी समितीला कोणाला ठेवायचे, कोणाला काढायचे, कोणाला निलंबित करायचे हे अधिकार आहेत. त्यांचे डिसीजन झाले, डिसीजन झाल्यानंतर दोन तीन विषय झाले व सभा संपायच्या दोन मिनिटे अगोदर उपसुचना आली ती उपसुचना कायदेशीर इनव्हॅलीड आहे. म्हणून ती इतिवृत्तांतामध्ये घ्यायची नाही. कारण एकदा ह्यांचे डिसीजन झाल्यानंतर कोणतीही उपसुचना सुचना नसते.

**याकुब कुरेशी :-**

मला वाटते त्यावेळी सन्मा. नगरसेवक चंद्रकांत वैती ह्यांनी सुचविले की अशा प्रकारे होऊ शकत नाही जे आपण वकीलांना सांगितले आहे. त्याच्यामध्ये थोडासा बदल करावा.

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेबांबरोबर आधी चर्चा करायला सांगितली होती हा बदल करायला त्यांनी सांगितले होते.

**मोहन पाटील :-**

ह्यावर मी सभा संपण्यापूर्वी तो विषय संपण्यापूर्वी असा विषय मांडला, मी सुचना केली आणि उपआयुक्त साहेबांनी उत्तर दिले की असे बोलावता येते. असे उत्तर दिले आम्हाला की, सभापती महोदयांनी जे रूलिंग दिलेले आहे. तर मी विचारले की असे बोलवता येते का, तर तुम्ही आम्हाला त्या विषयाची माहिती दिली की असे बोलवता येते.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

चर्चा करता येते पण त्यांना सभागृहात बोलवता येत नाही.

**रिटा शाह :-**

अध्यक्ष साहेबांनी असा निर्णय नाही दिला की मी सभेत बोलवेन. सभा चालू होण्याच्या पुर्वी दहा वाजता स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना विश्वासात घेउन त्यांचे आता डिसीजन आहे आणि असे सभापतींना आणि स्थायी समितीला अधिकार आहे. असा ही अधिकार आहे की, स्पेशल कुठला मॅटर असेल कारण ते वकील असेल पण ते महानगरपालिकेचे वकील आहेत म्हणून त्यांना मिटींगमध्ये यावे लागेल आणि स्थायी समितीने ठरविले की, त्यांना बोलवावे लागेल अमुक मॅटरसाठी मग आपण त्याला बोलवू शकतो. ते ही अधिकार स्थायी समितीला आहे. म्हणून माझे बोलणे असे आहे की, बोलवायचे नाही बोलवायचे तर अध्यक्ष पण काही अनाडी नाही त्यांना पण अक्कल आहे की, कसे काय बोलवायचे आणि कसल्या कायद्यात राहून बोलवायचे. मग नंतर जी उपसुचना आली ती उपसुचना प्रोसिडिंगमध्ये यायला नाही पाहिजे. कायदेशीर कामकाज करायला पाहिजे. एकदा विषय संपला उपआयुक्त साहेबांनी बोलले की, आपण ठरविले तर बोलवू शकतो त्यानंतर ते कायदेशीर आहे की, नाही ते कायद्यात बसते की नाही. आपल्याकडे कमीशनर आहेत तीन तीन उपआयुक्त आहेत ते बघणार. प्रोसिडिंगमध्ये तशी सुचना घ्यायची नाही आणि ते बेकायदेशीर आहे असे मी पत्र ही दिले आहे आणि कुठल्या सेक्शनखाली आपण कुठल्या अधिकाऱ्याला आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हिशोबाने काम करतात त्यांना बोलावण्याचा अधिकार स्थायी समितीला आहे.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती या ठिकाणी आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे जी वकीलांची टिम आहे त्या वकीलांकडून त्यांना उद्दिष्टे वगैरे आपण दिले असेल त्यांच्या उद्दिष्टांमध्ये ते कितपत यशस्वी झाले. याची खातरजमा आपण केली पाहिजे आणि सभापती या नात्याने आपण त्या वकीलांना बोलावून त्यांच्याशी यथोचित चर्चा करा आणि आपले जर फेव्हरेबल वकील महापालिकेच्या हिताच्या दृष्टीकोनातून काम करित असतील तर त्यांना पुढे आपण एक्स्टेंशन आपण देउ शकतो आणि जर

उद्दिष्ट पुर्ती करत नसतील. आढावा घ्यायचा आणि आढावा घेउन ते बसत नसतील तर त्यांना आपण बदलू शकतो.

**मा. सभापती :-**

आपण मिटींग घेउन त्यांना सांगू शकतो की, एवढी प्रकरण बाकी का आहेत.

**आसिफ शेख :-**

तसेच समितीमध्ये सगळयांची इच्छा असेल सन्मा. सदस्यांची की सभेमध्ये बोलवा तर एकदा बोलावून घ्या.

**रिटा शाह :-**

सचिव साहेब जो मी ४९८ चा मुद्दा उठवला आहे दोन ग्रीन झोनचे त्याचे मी पत्र ही टाकले आहे. आपल्या रिझरव्हेशन प्लॉटमध्ये ज्यांनी बिल्डिंग बांधलेली आहे. निदान त्या वकीलाला मिटींगमध्ये बोलवा. आपण त्यांना पत्र द्या की, आपण स्थायी समितीत हजर राहा. हा आपल्या स्थायी समितीचा अधिकार आहे. त्यांना बोलावून घ्या आणि त्यांच्याकडून आढावा घ्या आणि मागच्या सभेत बोलली जे वाढीव बांधकाम आहे त्याबद्दल तर सोडा पण त्यांना असे नाही बोलले आहे की, त्यांना सोडून द्यायचे. वाढीव बांधकाम ज्यांने केले आहे त्याच्यावर मी पत्र टाकले आहे. आपण त्यांच्यावर पण ॲक्शन घ्यायला पाहिजे. ॲक्शन घ्यायला मला असे वाटत नाही की, वाढीव बांधकाम केले म्हणून त्यांना नोटीस द्यायचे आणि नंतर नोटीस देउन त्यांना स्टे ऑडर घ्यायला संधी द्यायची. जर त्यांचे आणि आपले असे तालमेल करूनच चालायचे असेल तर वाढीव बांधकाम होवू द्या ना मग कशाला त्याबद्दल बोलायचे.

**मा. सभापती :-**

जी कामे न्यायालयात असतील त्याच्यावर आपल्याला काही करता येत नाही.

**रिटा शाह :-**

साहेब, आपण काही करू शकत नाही. ते मला मान्य आहे पण आपण त्यांना बोलावून आढावा तरी घेउ शकतो.

**मा. सभापती :-**

आढावा घेउन प्रत्येक तारखेला काय झाले ते आपण विचारू शकतो.

**रिटा शाह :-**

साहेब, मुख्य गोष्ट अशी आहे की, रिझरव्हेशनमध्ये बांधकाम झाले आणि समोरच्या व्यक्तीला स्टे मिळतो त्याचा अर्थ आपला अधिकारी त्यांच्यापर्यंत रिपोर्ट पोहचवतच नाही. त्यांना लेखी काही मिळतच नाही. मग वकील तिथे उभे राहून काय करणार काय?

**मा. सभापती :-**

त्यासाठी आपण त्यांना चर्चेसाठी बोलवायचे आणि आपल्याला पाहिजे तेव्हा आपण त्यांना सभेमध्ये बोलावून घेउ.

**रिटा शाह :-**

४९८ चे आणि ५२६ गार्डन रिझरव्हेशनचे जे वकील आहेत त्या वकीलांना बोलावून घ्या आणि आढावा घ्या. कार्यालयातून त्यांना काय मिळाले आहे, त्यांच्याकडे काय फिडअप झाले आहे.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये घनकचरा प्रकल्प व्हावा अशा पद्धतीचे सन्मा. सदस्यांनी मा. महासभेपुढे सुद्धा आणि आजही जे सर्वोच्च न्यायालयाने आपल्याला जे निर्देश दिले आहेत त्या निर्देशांची पुर्तता करण्याच्या दृष्टीकोनातुन आपण व प्रशासनाने वेळेच्यावेळी जी कामे करायला पाहिजेत. ती काम प्रशासनाने केलेली आहेत आणि जो फॉलअप महानगरपालिकेच्या नगरसेवकांच्या माध्यमातून व्हायला पाहिजे तो ही फॉलअप ह्या ठिकाणी सुरू आहे. आज आपण या विषय पटलावर विषय आणलेला आहे आणि त्या विषयाची संपूर्णपणे चर्चा मा. महासभेमध्ये झालेली आहे. मला वाटत नाही ती चर्चा या ठिकाणी पुन्हा बोलली पाहिजे. त्या चर्चेचे विषय पुन्हा या ठिकाणी मांडले पाहिजे मला जरूरी वाटत नाही. त्याचे कारण असे की, त्या विषयावर संपूर्णपणे चर्चा झालेली आहे आणि मा. महासभेसमोर आपण संपूर्णपणे बोललेलो आहोत. आज आपण या ठिकाणी चांगला विषय आणलेला आहें.

**मा. सभापती :-**

याचा ठराव झालेला नाही. मा. महासभेत काहीच झालेले नाही आणि ह्याचे काय करायचे म्हणून समितीसमोर आणले आहे.

**मोहन पाटील :-**

मा. महासभेत सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील ह्यांनी ठराव मांडलेला आहे.

**मा. सभापती :-**

पण त्या ठरावावर त्यांची अजून सही झालेली नाही.

**याकुब कुरेशी :-**

सही केली नाही पण ठराव झालेला आहे. सही घ्यायची किंवा नाही घ्यायची ती प्रशासनाची जबाबदारी आहे. पण मा. महासभेमध्ये ठराव झालेला असताना समितीसमोर ठराव झाला नाही असे बोलून चालणार नाही.

**मा. सभापती :-**

त्यावेळी सन्मा. सदस्य मोहन पाटील आपण देखील ठराव मांडला होता म्हणून त्याच्यावर निर्णय घेउन विचार घ्यावा असे ठरले होते. आपली त्यात सुधारणा होती.

**आसिफ शेख :-**

मी आपल्या माध्यमातुन उपआयुक्त (मुख्यालय) ह्यांना विचारू इच्छितो आणि सचिव साहेब ह्यांना विचारू इच्छितो की, एखाद्या वेळी आपण ठराव केला स्थायी समितीमध्ये किंवा मा. महासभेत आणि सुचक अनुमोदन म्हणून ठराव मंजुर झाला, बहुमताने पास झाला किंवा सर्वानुमते पास झाला. त्याच्यानंतर संबंधित सुचकाने किंवा अनुमोदकाने त्यावर जर सही केली नाही तर आपल्याला अशा परिस्थितीमध्ये काय करता येईल. अशा परिस्थितीत मार्ग काय?

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे ध्वनिफित आहे.

**आसिफ शेख :-**

आपण आम्हाला मार्ग सांगा की, ह्यावर मार्ग काय आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब आणि उपस्थित सन्मा. सदस्य गेल्या मा. महासभेमध्ये हा विषय चर्चेसाठी आला होता. त्यावेळी आपले सन्मा. जेष्ठ नगरसेवक प्रफुल्लजी पाटील त्यांनी ह्यावर ठराव मांडला आणि त्यावर उपसुचना श्री. मोहनजी पाटील यांनी त्यावेळेस मांडली परंतु त्यांची उपसुचना ही मौखीक स्वरूपाची होती. या कारणास्तव त्यांची उपसुचना स्विकारली गेली नाही आणि प्रफुल्ल पाटील ह्यांचा मुळ ठराव गृहीत धरून तो सभागृहात मंजूर झाला होता. सभागृहात मंजुर झाल्यानंतर त्या ठरावावर रितसर ठराव जो केला जातो त्या ठरावावर सुचक अनुमोदकाची सही आवश्यक असते आणि त्यावर त्यांची सही नसल्यामुळे रोज आमचा कर्मचारी व जवळजवळ सातत्याने नगरसचिव हे संबंधित नगरसेवक प्रफुल्लजी पाटील ह्यांच्या संपर्कात आहेत आणि सातत्याने त्यांच्याशी पाठपुरावा करून आयुक्त साहेबांनी ही त्यांच्याशी चर्चा केली, नाईक साहेबही त्यांच्याशी बोलले, त्यांचीदेखील चर्चा झाली. परंतु अद्याप पर्यंत त्या ठरावावर त्यांनी सुचक म्हणून ठराव केला त्या प्रस्तावावर त्यांनीच सही केली नाही. म्हणून आम्ही त्यांना वेळोवेळी विनंती करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आम्ही सभागृहाला अशी विनंती केली आणि गेल्या वेळेपासून ती परंपरा आपल्या सभागृहात सातत्याने सुरू केली की ज्याने सुचक म्हणून ठराव मांडायचा आणि ठरावावर सही न करता कुठलाही प्रस्ताव डायसवरून ह्याच्यानंतर स्विकारला जाणार नाही आणि त्या तऱ्हेची परंपरा सभागृहात गेल्या सभेपासून सुरू झाली आहे आणि ही ह्याची वस्तुस्थिती आहे. व आम्हीदेखील त्यांच्या संपर्कात आहोत. परंतु अद्यापपर्यंत त्यांच्याकडून ठरावावर सही होउन आलेले नाही आहे आणि त्यांची सही झाल्यानंतरच ठराव मंजुर होतो.

**आसिफ शेख :-**

अशा परिस्थितीत काय करायचे?

**रिटा शाह :-**

तुमची त्यांच्यासोबत चर्चा झाली. तर ते काय सांगतात काय, ते आपण सांगा. ते सही करायला तयार आहे का नाही आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

आज पाठवतो उद्या पाठवतो असे सांगतात.

**आसिफ शेख :-**

संबंधित सन्मा. सदस्यांनी सही केली नाही सुचक किंवा अनुमोदकानी. एखादा ठराव केला आणि तो बहुमताने किंवा सर्वानुमते मंजुर झाला आणि सही केली नाही तर आपण काय करू शकतो. आता जसे उपआयुक्त कल्याण केळकर साहेबांनी सांगितले की, आयुक्त साहेबांनी त्यांच्याबरोबर चर्चा केली, उपआयुक्त साहेबांनी त्यांच्याबरोबर चर्चा केली. तरी अशा परिस्थितीत सही होत नाही तर त्याला पर्याय काय? कायदेशीर मार्ग काय? त्याचा खुलासा करावा.

**प्र. सचिव :-**

जर संबंधित नगरसेवकांनी तसा नकार दिला तर पुन्हा नोटींग करून ते सभागृहाच्या निर्देशनात आणावे असे आहे.

**रिटा शाह :-**

तुम्ही आमच्या निर्देशनात आणले हे बरोबर आहे. पण मा. महासभा म्हणजे आपण तिथे मजाकमस्ती करत नाही. महासभा म्हणजे त्यांची काहीतरी व्हॅल्यु आहे. महासभेत मी कुठलाही ठराव पारीत करते तेव्हा माझी समज माझ्याकडे असते आणि तेव्हा मी हा ठराव मांडते. ठराव मांडल्यास संपूर्ण शहराचा प्रश्न असतो. आपण कुठलाही ठराव करतो त्याच्यामध्ये आपल्या शहराच्या विकासाचा प्रश्न असतो आणि नगरसेवक आणि लोकप्रतिनिधी यानात्याने मी कुठलाही ठराव केला तर मला ते कायद्याचे बंधन आहे की, त्या ठरावाला मी बाजूला आहे की, तो ठराव केल्यानंतर मी फिरते. त्याला काहीतरी कायदेशीर बंधन असेल तर त्या कायदेशीर बंधनचा आपण उपयोग केला काय?

**प्र. सचिव :-**

सभागृहात जो ठराव झाला होता जसा ठराव झाला तशी त्याची प्रत लगेच सहीसाठी पाठविली आहे. व ब-याचवेळा फोनवर चर्चा केली आहे.

**रिटा शाह :-**

चर्चा केली सर्व काय ते केले ते लिगरिंग करतात देतो नाही देत असे चाललेले आहे. पण त्याच्यावर काहीतरी कायदेशीर बंधन आहे त्याचा आपण उपयोग केला काय?

**प्र. सचिव :-**

सभागृहापुढे मला नोटींगसाठी ठेवावे लागते ज्यावेळेला पुढची मा. महासभा होईल.

**रिटा शाह :-**

साहेब, पुढची सभा होईल असे आपण बोलता. पण सभा झाली आणि ते प्रोसिडिंगमध्ये आपण ते सर्व नमुद करता तर प्रोसिडिंगमध्ये घ्यायच्या अगोदर त्या ठरावावर तुम्हाला त्यांची सही लागेल. त्याशिवाय तुम्ही प्रोसिडिंगमध्ये घेउ शकत नाही. मग पुढच्या सभेपर्यंत प्रोसिडिंग तयार करताना समजा मी सही केली नाही आणि मी लिंगरींग केले. एक लिमिट असते त्याची त्यानंतर तुम्ही माझ्यावर काही कायदेशीर नोटीस पाठविली काय की, तुम्ही ठराव मांडल्यानंतर त्याच्यावर सही केली नाही अशा प्रकारचा तुम्ही काही पत्रव्यवहार केला आहे का?

**प्र. सचिव :-**

ठरावाची जी मुळ कॉपी होती ती आम्ही सहीसाठी पाठविली होती.

**रिटा शाह :-**

तुम्ही महानगरपालिकेची कव्हरींग कॉपी पाठवली आहे का, की असे असे ठराव केला आहे आणि तुमच्याकडे माणूस पाठवला आहे आणि तुम्ही सही केली नाही. याबाबत तुम्ही आम्हाला लेखी उत्तर द्या. तुम्ही सही का करत नाही असे पत्र पाठवले आहे का? त्याबद्दल तुम्हाला काही अधिकार आहेत का नाहीत.

**प्र. सचिव :-**

ठराव वाचून सही करून पाठवतो येथपर्यंत त्यांनी आम्हाला सांगितले आहे.

**रिटा शाह :-**

हे सर्व कायदेशीर गोष्टी आहेत. मा. महासभा तुमच्या आणि आमच्यासाठी मजाक नाही आहे. हे सर्व कायदेशीर गोष्टीमध्ये कुठले रिलेशन नसते. जर कायदेशीर चालायचे असेल तर तुम्ही कायदेशीर सभा चालवा आणि आपल्याला रिलेशन मेनटेन करून चालायचे असेल तर तसे चालवा. येथे

काय आपल्याला रिलेशन वाईट करायचे नाही. कारण घनकचरा विषय हा असा विषय आहे की, त्याच्यामध्ये संपूर्ण शहराचा प्रश्न आहे, विकासाचे काम आहे आणि आपण फक्त रिलेशन मेनटेन करण्यासाठी व्हर्बली गोष्टी करतो कुणाशी तर ते वाजवी नाही. आपण कायदेशीर जा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, याठिकाणी आपण चर्चा केली आपण मघाशी बोललात की, अशा पद्धतीने तो विषय झालेला नाही आहे. म्हणून आपण विषय आणलेला आहे. असा विषय आहे तर आपण चर्चा केलेली ती गोषवाऱ्यामध्ये टिपणीमध्ये द्यायला पाहिजे होते की, अशा पद्धतीने मा. महासभेमध्ये असा ठराव झाला होता. त्या ठरावाप्रमाणे सुचक आणि अनुमोदन यांनी या सह्या केल्या नाहीत त्यामुळे तो ठराव पुर्णपणे फुलफिल झाला नाही. अशा स्थितीमध्ये आपल्याला पुढचे काम करायचे आहे म्हणून आपण हा विषय येथे आणलात असे गोषवाऱ्यामध्ये यायला पाहिजे होते.

**मा. सभापती :-**

मी पाच दिवस अगोदर आयुक्त साहेबांना भेटलो. त्यावेळी त्यांना विचारले की काय झाले, काय करायचे आहे. त्यावेळी ते म्हणाले मी काय करणार मी सभागृहापुढे विषय ठेवला होता. पण माझ्याकडे अजून ठराव आलेला नाही. मी काय करणार, मी माझे काम केलेले आहे. म्हणून मी म्हटले ठिक आहे आपण आपले काम केले आहे आणि मला वाटले आपण स्थायी समितीच्या सदस्यांनी आपणही आपले काम करून घ्यावे. म्हणून हा विषय अर्जंट दोन दिवसामध्ये मी ठेवायला लावला.

**मोहन पाटील :-**

साहेब, विषय तो नाही. माझे काय म्हणणे आहे आपली भुमिका चांगली आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले ते काम पूर्ण झाले पाहिजे. सभागृहाची धारणा देखील तिच आहे. प्रशासनाच्या काही अडचणीमुळे कारण ठराव सदस्यांनी दिला आणि ठराव सदस्यांनी दिल्यानंतर तो फुलफिल प्रशासनाने करून घेतला पाहिजे. तर सन्मा. सदस्या ह्यांनी ह्या ठिकाणी आपली जी भूमिका मांडली आहे त्या भूमिकेत आमचे स्पष्ट उद्देश आहे की, प्रशासनाने ह्याच्यामध्ये विलंब लावलेला आहे. जर आपण त्या सन्मा. सदस्यांना लेखी स्वरूपामध्ये दिले असते की, अशा पद्धतीचा आपण ठराव केला आहे आणि त्या ठरावामध्ये आपण मौखिक दिले की, या ठरावामध्ये आपण सही करतो पण आपण सही केली नाही तर आपण सही करा. अन्यथा आम्हाला हा विषय विषयपटलावर आणावा लागेल. अशा पद्धतीचे लेखी पत्र न दिल्याने त्या विषयामध्ये दिरंगाई झाल्याचे दिसून येते. प्रशासनाने ती भूमिका घेतली नाही आणि दिरंगाई हे दिसून येते आणि आता आपण विषय या ठिकाणी आणलेला आहे. तर या विषयावर आम्हाला असे बोलायचे आहे, आपण बजेटमध्ये देखील घनकचरा प्रकल्पासाठी तरतुद केलेली आहे. आज आपण हा विषय ह्या ठिकाणी आणलेला आहे की, जागा आपल्या ताब्यात आहे ती जागा आपल्याला जिल्हाधिकाऱ्याकडून मिळालेली आहे आणि त्या जागेवर अतिक्रमण होउ नये. अशा पद्धतीची भूमिका आपली आहे आणि आपल्याला पुढे काम करण्यासाठी ती जागा उपलब्ध झाली पाहिजे. म्हणून याकरिता आपण ह्या ठिकाणी विषय आणलेला आहे. त्याविषयाला अनुसरून मी आपल्याला सांगू इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकाच्या हद्दीमध्ये घनकचरा प्रकल्प मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून जमीन महानगरपालिका हस्तांतरण झालेली आहे व सदर जागेवर अतिक्रमण होउ नये म्हणून कुंपण बांधणे आवश्यक आहे. कुंपण भिंत बांधणे कामाचे रक्कम ८०.८१ लक्ष एवढया रक्कमेचा अंदाज करण्यात आलेला आहे. एवढया रूपयाची जागा आपल्याकडे हस्तांतरण झालेली आहे. त्या जागेवर अतिक्रमण होउ नये आणि घनकचरा प्रकल्पासारखा विषय हा सुटला पाहिजे आणि कामाला सुरूवात झाली पाहिजे. याकरिता याकामी येणाऱ्या खर्चाकरिता प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळावी. अशा पद्धतीची या विषयावर चर्चा झालेली आहे आणि मा. महासभेमध्ये ठराव ही झालेला आहे आणि ठराव होउनही या पद्धतीचा ठराव मी करत आहे की, ह्या घनकचरा प्रकल्पासाठी ती जागा राहिली पाहिजे आणि कुंपण घालण्याकरिता आपल्याला आर्थिक प्रशासकीय मंजूरी मिळण्यासाठी मा. महासभेपुढे शिफारस करत आहोत असा ठराव मी या ठिकाणी मांडत आहे.

**याकुब कुरेशी :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

आपण सर्व सभासदांनी मंजुरी दिली पाहिजे एवढेच माझे म्हणणे आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, याठिकाणी आपण जो अगोदर खुलासा केला की, मा. महासभेत चर्चा होउन, ठराव होउनदेखील तिथे काही झाले नाही म्हणून आपण या ठिकाणी जे आत्मयितेने जे आणले आहे व मा. सर्वोच्च न्यायालयाचे डायरेक्शन आहे की, ३१ डिसेंबर, पूर्वी यामध्ये निर्णय व्हायला पाहिजे. आपण ऑलरेडी मा. महासभेमध्ये निर्णय घेतलेला आहे आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे काम प्रशासनाचे आहे. प्रशासनाने दिरंगाई केली. कोणत्या पद्धतीने चर्चा केली, काय काय केली आणि जो खुलासा सचिव साहेबांनी येथे दिला आहे त्या खुलाशाशी मी तरी सहमत नाही. म्हणून मी पुन्हा विचारतो असा जर प्रश्न उद्‌भवत असेल संबंधित ठराव करणारा सुचक आणि अनुमोदन जर सही करत नसेल तर कायदेशीर मार्ग काय? त्या मार्गाचा खुलासा करावा. आम्ही आपल्याला कायदेशीर विचारतो आपण आम्हाला कायदेशीर मार्ग सांगा.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपण बोललात ना आणि आम्ही तो ठराव मांडला. पण आपण जो विषय विषयपटलावर आणलेला आहे त्या विषयाशीच आपण चर्चा करू शकतो. विषयपटलावर विषय आणला असेल आणि आपण विषय सोडून जर आपण ठराव मांडला तर मला वाटत नाही ते योग्य होईल असे. आपण विषय आणलेला आहे की, या ठिकाणी मा. महासभेत ठराव झालेला आहे. हे मा. महासभेचे काम आहे. आपल्याला अशा पद्धतीने निर्देश दिलेले आहेत स्थायी समिती म्हणून आपल्याला कमीशनरने किंवा प्रशासनाने निर्देश दिले आहेत का, की अशा पद्धतीचा ठराव मा. महासभेत झालेला आहे आणि या ठरावाववर अनुमोदन, सुचक यांनी सही केलेली नाही आहे. यांच्यामुळे तो प्रश्न प्रलंबित झालेला आहे. अशा पद्धतीचे निर्देश आपल्याला कमीशनर साहेबांनी दिले आहे का?

**मा. सभापती :-**

आम्हाला सर्वांना दिलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

मग तुम्हाला सर्वांना दिलेले आहे मग गोषवाऱ्यात ते का दिले नाही. तो विषय गोषवाऱ्यामध्ये यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

त्यांचे काम त्यांनी पुर्ण केले आहे. मा.महासभेत विषय ठेवलेला.

**रिटा शाह :-**

स्थायी समितीच्या सदस्यांना तरी द्यायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

हा विषय कसा आला आहे ते आपण बघा. सचिव साहेब आपण तो गोषवारा वाचा.

**मा. सभापती :-**

मी सभापती असल्याकारणाने हा विषय घेतला आहे. कारण माझ्यावर उद्या काही येता कामा नये. म्हणून हा विषय मी आपल्या समोर आणला आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब आपण आता सांगितले की, मला भिती आहे. पण आम्ही पहिल्यापासून सांगतोय ज्या दिवसापासून चार्ज घेतला त्या दिवसापासून आम्ही सांगतोय की, तुम्ही कुठे अडचणीत येउ नये, ही आमची भावना आहे. म्हणून सांगितले की, आपण ह्याच्यावर आम्हाला कायदेशीर मार्ग सांगा. प्रत्येक वेळी आम्ही आपल्याला सुचित करतो, आपण जे निर्णय घेतो, ते निर्णय घेताना आपण सर्वांना विश्वासात घ्यावे. चांगले काम करताना आम्ही आपल्याला सांगितले आहे की, आम्ही आपल्या बरोबर आहोत. पण जी ह्या ठिकाणी दिशाभुल चाललेली आहे आणि या ठिकाणी जो खुलासा केला आहे त्याने समाधानच होत नाही की, एखाद्या सदस्याने जर सही दिली नाही तर काय करणार? त्याच्यावर कायदेशीर मार्ग काय? प्रत्येक वेळी आपण पुन्हा पुन्हा मा. महासभेमध्ये विषय आणणार का? मा. महासभेचा पुन्हा पुन्हा आपण एवढा वेळ घेणार का? कायदेशीर मार्ग सांगा आपण आम्हाला की, काय करता येईल. मोहन पाटील साहेबांनी ठराव मांडला आहे आणि अनुमोदन याकुब कुरेशी साहेबांनी दिले आहे. उद्या मोहन पाटील साहेबांनी सांगितले की, जा मी सही करत नाही तर काय करणार? ते बहुमताने झाले आहे ना. ह्याच्यावर खुलासा करा. नाहीतर वकीलांना बोलवा की ह्यावर काय करता येईल. खुलासा करत नाही परत परत तेच ते विषय चालू आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेमध्ये जी काही चर्चा होते त्यामध्ये आपले पदसिद्ध सदस्य जे बसलेले आहेत. त्यामध्ये स्वतः मा. महापौर, मा. विरोधी पक्षनेते, मा. सभागृहनेते. आज जवळ जवळ हा महत्त्वाचा विषय आहे आणि त्याची ३१ डिसेंबर पर्यंत अंतिम मुदत आहे. अंतिम मुदत दोन दिवसावर आली असताना सुद्धा आपण नुसते प्रशासनावर वार करण्यात अर्थ नाही. जे प्रशासकीय लेव्हलच्या बाजूने जी लोक आहेत ते निराळे, लोकप्रतिनिधींच्या बाजूने जी काही पद आपण निर्माण केलेली आहेत त्याला आपण सर्व सोयी दिल्या आहेत. त्या कशाकरिता आहेत. सभागृहनेत्याला वाटले नाही का, या ठरावाचे काय झाले ३१ डिसेंबर पर्यंत आपल्याला शेवटची मुदत आहे. विरोधी पक्षनेत्याला वाटले नाही का, या ठरावाचे काय झाले. आम्ही पत्र द्यायला गेलो तेव्हा सांगतात की, हा ठरावच झालेला नाही आणि परवा आयुक्त साहेबांनी आम्हाला शॉक दिला. ते म्हणतात, ठराव तुम्ही आम्हाला आणून द्यायचा असतो. ते आमचे काम नाही. तुम्ही मंजुर करायचे आणि आम्हाला आणून द्यायचे असते. हे तुमचे काम आहे. माझे काम संपले, मी सभागृहापुढे दिले आहे. आज सांगतोय तुम्हाला, कोणत्या सदस्याला माहिती नसेल. आयुक्त साहेबांनी आयुक्तांचे काम वेळेवर आणि परफेक्ट केले आहे. त्यांनी सर्व तयार करून सचिव साहेबांच्या हातात रॅपर ठेवून दिला. मा. महापौरांची परमीशन घेतली आणि सचिव साहेबांकडून त्यांनी त्या तारखेला ॲक्नॉलेझमेंट घेतले आहे आणि आता आयुक्त साहेब बोलतात माझे काम संपले. सभागृहाने भांडण करावे किंवा प्रफुल्ल पाटलांनी ठराव द्यावा किंवा देउ नये ते सर्व तुमच्यावर आहे. आज जर तो ठराव पुर्ण झाला नाही आणि नुसते तुम्ही प्रफुल्ल पाटील साहेबांनी सही केली नाही म्हणून आपण काय केले, हे विचारण्यात आता अर्थ नाही. आज त्याच्यामध्ये सगळे आपण गुरफटतोय. कारण तो ठराव सर्वानुमते मंजुर झालेला आहे व त्याला कोणी विरोध केलेला नाही आणि तुमची उपसुचना फेटाळली आणि तो पहिला ठराव स्टीकअप झालेला आहे. म्हणजे त्या ठरावाची कॉपी पाहिजे. आज सभागृह नेत्यांनी ह्याच्यावर काय केले? त्यांनी जाउन त्यांना भेटायला पाहिजे होते. पोलायटली पहिले प्रेमाने सांगायला पाहिजे होते. त्याच्यानंतर तुम्ही खरबरीत पत्र द्यायला पाहिजे होते. मी तर तुम्ही बोलता त्याचे पुढचे मी बोलतो की, तुम्ही त्यांना नोटीस काढा. प्रफुल्ल पाटलांच्या एका सहीमुळे आम्ही कशाला मरायचे, काही देणंघेणं नाही आम्हाला. उद्या प्रफुल्ल पाटील यांच्यावर आले तर ते मोठे वकील करू शकतात, तसे आम्ही नाही करू शकत. तुम्ही सरळ प्रशासनाने त्यांच्यावर नोटीस काढा. कोणीतरी ठराव ठेवायचा आणि निघून जायचे आणि मग सहीसाठी प्रशासन धावते त्यांच्या मागेपुढे. त्या दिवशी आयुक्त साहेब बोलले की, त्यांच्याबरोबर चार तास डिसकस केले, कशासाठी? तुम्ही त्यांना सरळ ठराव नेउन द्या. हा तुमचा ठराव आहे आणि तुम्ही ह्याच्यावर सही करा. सभागृहात सगळयांसमोर ठराव मांडला आहे आणि त्याला शंभर लोक साक्षी आहेत. प्रफुल्ल पाटील यांनी ठराव ठेवला. तुम्ही जसे बोललात कॅसेट आहे असे सगळे काही पुरावे आहेत. जर ते प्रेमाने मानत नसतील तर जबरदस्ती करा. आम्ही कोणी एका माणसाकरिता मरायला तयार नाही. म्हणून आम्ही सभापतींना भेटलो, आयुक्त साहेबांना भेटलो आणि सध्या ही लटकती परिस्थिती आहे आणि कोणालाही काही माहिती नाही. आयुक्त साहेब बोलतात की, तुमच्या लोकप्रतिनिधींचा ठराव माझ्याकडे आलेला नाही, प्रशासनाची जबाबदारी संपलेली आहे. लोकप्रतिनिधींनी ठराव आणून दिल्यानंतर त्याचा कोट चालू होईल. अशी बुधवारी चर्चा झाली. त्यांच्यानंतर स्पेशल त्यांची परमीशन घेउन आम्ही मुद्दामहून हा ठराव घ्यायला लावला की, मा. महासभेमध्ये आपल्याला अहंग आहे ना, मा. महासभेत अजून काही ठरलेले नाही. म्हणून स्थायी समितीमध्ये दोन ओळीचा ठराव पास करून घेउ या की, ह्याला आपण ही मंजुरी दिली. तशी ३१ डिसेंबरच्या आतमध्ये आपण कागदोपत्री काम केलेले आहे. क्लेरीकल जॉब आपला काहीतरी पुर्ण झालेला आहे. अशी आमची निरपेक्ष अशी एक इच्छा आहे. दुसरी गोष्ट आतापर्यंत आपल्या ३१ तारखेला ह्या सॉलेड वेस्ट मॅनेजमेंटची ही जी प्रश्नावली आहे ती संपूर्ण फुलफिल करून प्रत्येक नगरसेवकाला प्रशासनाने दिली पाहिजे. ती अजूनपर्यंत आम्हाला मिळालेली नाही आहे. २९, ३० आणि ३१ फक्त तीन दिवस राहिलेले आहेत. आता ह्याच्यात सुद्धा आम्ही मुद्दामुन पत्र टाकून टाईम वगैरे घेउन तारीख टाकून घेतली आहे. आमचे आम्ही सेफ. प्रशासनला आम्ही कळवले आहे ह्याची प्रश्नावली आपण फुलफिल करून देउन टाका. दिली तरी ठिक नाही नाही दिली तरी ठिक. आमचे काम आम्ही नगरसेवक या नात्याने केलेले आहे. ह्या काय ज्या चुका आहेत त्या झाल्या पाहिजेत. पंधरा दिवस अगोदर आपल्याला हा अहवाल, जेव्हा मागच्या सभेमध्ये हा विषय आला त्याचवेळेला आम्ही उठून त्याच्यावर बोललो होतो आणि आयुक्त साहेबांनी

सांगितले दोन दिवसामध्ये अहवाल दिला जाईल. सभागृहामध्ये तशी नोंद केलेली आहे. आज या गोष्टीला दीड महिना होत आला आहे. अजून पर्यंत आम्हाला मिळाली नाही म्हणजे तिथपर्यंत तयार झाली नाही असे आम्ही समजणार. आज प्रकरण १९० या विषयावर आणखीन थोडी विस्तृत माहिती मला हवी आहे ती अशी की, आपण जो हा १९० विषय घेतलेला आहे. यामध्ये घनकचरा व्यवस्थापनाकडे आपण कुंपणाची परमीशन मागतोय. उत्तनमध्ये एकूण ही जागा ह्या व्यवस्थापनेची किती आहे. म्हणजे त्याचा एरिया किती आहे. उत्तन आणि पाली या संपूर्ण ह्याच्यामध्ये प्रोसिडिंगमध्ये सुद्धा कुठलाही सर्वे नंबर मेनशन नाही. तो सर्वे नंबर काय आहे. ह्याचे उत्तर तुम्ही नंतर मला द्या. त्या जागेची पूर्ण परीघनिहाय माहिती काय. कुंपणाची आपण हाईट किती घेणार आहोत जमिनीच्या सरफेसपासून म्हणजे अंडरग्राउंड किती आणि जमिनीच्या वर किती. त्यानंतर ही जी भिंत आहे ती आपण कुठल्या आयटममध्ये घेणार आहोत. सी.सी. आयटम आहे, दगडाचे आहे, तारेचे आहे का कुठले आहे. कारण कुंपण लावणार म्हणजे तारा लावून टाकणार आणि तारा उद्या लोक कापणार आणि आवो जावो असे होणार आहे असे व्हायला नाही पाहिजे. त्यासाठी तो आयटम कोणत्या टाईपचे आहे. जागेवर आजच्या तारखेला अतिक्रमण आहेत का? जर असतील तर ती कुठल्या प्रकारची आहेत. टेम्परारी आहे, आर.सी.सी. आहे, विटांची आहे काय आहे ते गोषवाऱ्यामध्ये काय दिलेले नाही आहे. सदर जागेत खाजगी मालमत्ता काय येते का? सर्वे नंबर खाजगीचे काही आहेत का आणि असल्यास ते किती आहेत. या जागेतून जी अतिक्रमण आपण आतापर्यंत हटविलेली आहेत का? आणि फक्त दोन शेवटचे प्रश्न असे आहेत आपल्याकडे टोटल बजेटमध्ये ह्याची एक करोड रूपयाची आपण तरतुद केलेली होती. त्यातली काही तरतुद खर्च झाली आहे का? आणि उर्वरित राहिलेली तरतुद किती? आता हे ३१ डिसेंबर संपूर्ण संपत आहे. त्यादिवशी आयुक्तांनी आणखीन एक मुद्दा काढला की, आपल्याला हा ठराव घ्यायचा आहे. पण त्याच्यामध्ये आपण त्या पैशाचा उल्लेख कसा काय करू शकतो. पण ह्या प्रपोझल करता ह्या पूर्वी रस्त्यासाठी ४५ लाख रूपये आपण रस्त्याकरिता राखून ठेवले आहे व त्याचे टेंडरही निघाले आहे. आपण टिपणी सर्व व्यवस्थित द्या आणि ते रेकॉर्डला आणा आणि तो ठराव ठेवताना ह्या गोष्टी घेउन तुम्ही तो ठराव करून घ्या. साहेब, ह्या माझ्या सुचना आहेत आणि हे असे असलेच पाहिजे. टिपणी ही अशी नाही. विदाउट सर्वे नंबर तुम्ही गोषवारा दिला आहे. एरिया नाही, सर्वे नंबर नाही, गावाची हद्द कोणती ते नाही. तर बजेटमध्ये जी आपली तरतुद आहे त्याची मला माहिती द्या. ह्या अगोदर रस्त्यासाठी आपण काम केले आहे आणि लवकरात लवकर अतिक्रमण ह्या जागेवर होउ नये, आपल्याला ती जागा मोफत मिळेल. आपल्या हातातून ती जागा जाउ नये म्हणून या ठरावाला माझे अनुमोदन आहे ह्याची नोंद करून घेण्यात यावी.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मिलन म्हात्रे साहेबांनी बोलले की, प्रशासनाने आपले काम केले आणि नगरसेवक फसले. असे काही नाही आहे. मा. महासभेत विषय आणला आणि नगरसेवकांनी आपले कर्तव्य बजावले आम्ही अनुमोदन दिले आहे त्या ठरावाला. सर्वानुमते अनुमोदन झाले आहे आणि आता ठराविक व्यक्तिंनी त्या सुचना मांडुन अनुमोदन करून उपआयुक्त साहेब, सचिव साहेब आता म्हात्रे साहेब बोलले की, प्रशासनाने आपले काम केले आणि नगरसेवक फसत आहे तर असे काही नाही. आम्ही आमचे काम केलेले आहे. तुमचा ठराव तुम्ही आम्हाला दिला आणि आमच्या पर्यंत ठराव आला आणि आम्ही सर्वानुमते ते मंजुर केलेले आहे. आता तर उलट ह्याच्यामध्ये प्रशासन फसत आहे असे मी ठामपणे बोलते. कारण मा. महासभेत ठराव झाला, अनुमोदन झाले, सुचना झाली त्यानंतर तुमच्याकडे रेकॉर्डिंगसुद्धा आहे. त्या वस्तुचा तुम्ही उपयोग केला नाही आणि तुम्ही नुसते त्यांच्याशी गोष्टया केल्या की तुम्ही त्यांच्या घरी गेले, पाया पडले ते आम्हाला बघायचे नाही आहे. तुम्ही कायदेशीर जायचे होते. तुम्ही नोटीस पाठवायची होती पण तुम्ही नोटीस नाही पाठविली आणि ह्याच्यामध्ये प्रशासन फसले आहे आणि अशा कुठल्याही ठरावाला मी अनुमोदन करणार नाही. आपल्याकडे विषय आला आहे की, कुंपण भिंत बांधायचे त्याची शिफारस मोहन पाटील साहेबांनी केली आहे. त्या शिफारशीला मी तुमच्या बाजूने आहे. बाकी ते घनकचरा या विषयाला सुचक व अनुमोदन झालेले आहे आणि तो ठराव मा. महासभेमध्ये झालेला आहे. तो येथे आणण्याचा प्रश्नच येत नाही. त्याला आम्ही मा. महासभेत अनुमोदन केलेले आहे. आता प्रशासनाला बघायचे आहे नोटीस पाठवून करायचे आहे का, काय करायचे आहे. त्यांना कसे बोलवायचे आहे आणि कशी सही घ्यायची आहे. हे प्रशासनाचे काम आहे. आमचे काम नाही.

**अनंत पाटील :-**

या संदर्भामध्ये आपण ह्या विषयामध्ये मा. महासभेमध्ये कल्याण, डोबिंवली, ठाणे यांच्या संयुक्तपणे हा प्रकल्प उभारला जाईल असे वेळोवेळी आम्हाला सभागृहामध्ये सांगितले गेले होते आणि प्रशासनाने ही बाजू मांडण्यासाठी सर्व काय अलबेल आहे. सर्व काय तयारीत आहे. थोडयावेळामध्ये ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवलीचा प्रकल्प उभारला जाईल. अशी प्रशासनाने आमची दिशाभुल केलेली आहे. हा ठराव सर्वानुमते झालेला होता.

**मा. सभापती :-**

प्रशासनाने तशी दिशाभूल केलेली नाही. तसे सांगितले तसे झाले तर तसे करू नाहीतर शेवटी हाच पर्याय आहे नाहीतर जिथे आपल्याला शासनाने जागा दिली आहे तिथेच करता येईल.

**अनंत पाटील :-**

चर्चा झाली होती. ठराव झाला होता आणि त्या ठरावावर सही झाली नाही एवढीच अडचण आहे. तांत्रिक अडचण ही नगरसेवकांच्या निदर्शनात आणण्याचे काम प्रशासनाचे आहे. आपण आता ही म्हणतो घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था झालेली आहे. फक्त प्रशासनाने त्यावर काम करायला पाहिजे. काम करण्याची मंजूरी फक्त जे आता कुंपण करणे, अतिक्रमण होउ नये एवढयासाठीच हा विषय आणलेला आहे. म्हणजे घनकचरा व्यवस्थापनेची व्यवस्था प्रशासनाच्या दृष्टीने झालेले आहे आणि नगरसेवकांनी त्याला पाठिंबा दिलेला आहे अशी वस्तुस्थिती आहे.

**मा. सभापती :-**

प्रफुल्ल पाटलांनी या विषयावर दोन तास भाषण दिले. ते तुम्ही ऐकले असेल. त्यांचा विचार वेगळा आहे. म्हणून मला भिती वाटते की, आपल्या स्थायी समितीच्या सदस्यांवर काही येउ नये. म्हणून ते साईन देत नाही. अजूनपर्यंत त्यांचा ठराव मंजूर झालेला नाही. मी पाच दिवस अगोदर चर्चा केल्यानंतर मला कळले. आपण स्थायी समिती त्याला मंजूरी देतो आणि त्याला प्रशासन मंजूरी देतो किंवा नाही देतो हा माझा मुद्दा आहे.

**अनंत पाटील :-**

नगरसेवक कुठल्याही बाबतीत जबाबदार राहणार नाहीत. ही आर्थिक प्रशासनाची मंजूरी आहे.

**मा. सभापती :-**

आपण पूर्ण ह्याच्यासाठी मंजूरी देत आहोत. हा पूर्ण एक विषय घेतला की चालू करा. असे रोडसाठी पैसे गेल्यावर्षी निघाले पण रोडदेखील अजून चालू नाही. पण कधी करा किंवा करू नका.

**शरद पाटील :-**

सभापती महोदय, तशी टिपणी द्यायला पाहीजे होती. टिपणीत तर फक्त बांधकामाची भिंत बांधण्याची परवानगी मागितली आहे. आपण आम्हाला अंधारात ठेवायचे आणि कुठचाही ठराव करून घ्यायचा ह्याला काय अर्थ आहे का?

**मा. सभापती :-**

पूर्वी ठराव झालेला नव्हता.

**शरद पाटील :-**

आता म्हात्रे साहेबांनी सांगितले की ही नगरसेवकांची जबाबदारी आहे. जेव्हा आम्हाला माहितीच नाही की, त्यांनी ठरावावर सही केली नाही तर आमची जबाबदारी कुठे आली.

**मा. सभापती :-**

मला माहिती पडले म्हणून मी सांगतोय आणि त्याकरिताच हा विषय घेण्यात आलेला आहे.

**शरद पाटील :-**

म्हात्रे साहेब आपण आयुक्त साहेबांकडे गेलात त्यामुळे आपल्याला माहिती पडले आणि सभापती महोदय आता आपण म्हणता की संपुर्ण ह्याला परवानगी द्यायची. तर प्रशासनाने सविस्तर टिपणी द्यायला पाहिजे होती. येथे फक्त बांधकामाला मंजुरी मागितली आहे तर बांधकामाला आम्ही मंजूरी देत आहोत.

**मा. सभापती :-**

दुसऱ्या सभेत हा विषय ठेवणार आहे.

**शरद पाटील :-**

मग आता कशाला मंजूरी मागत आहात.

**मा. सभापती :-**

आपण त्याला मंजुरी दिली म्हणून आपण मोकळे.

**शरद पाटील :-**

आता आपण कशासाठी मंजूरी द्यायची.

**मा. सभापती :-**

घनकचऱ्यासाठी मंजूरी द्यायची आहे.

**शरद पाटील :-**

म्हात्रे साहेब, तुम्ही बोला टिपणी सविस्तर असल्याशिवाय तुम्ही त्याला मंजुरी द्याल का.

**दिनेश नलावडे :-**

मा. सभापती आपल्याकडे जेव्हा १९० चा विषय आला आणि उपायुक्त केळकर साहेब, आता आपण परत विषय दिला तिथे जे काही प्रकरण झाले तिथे आपल्याला सही दिली नाही. त्याच्यासाठी जे कायदेकानुन आहेत ते प्रशासनाला माहिती आहे. आता सभापती हे त्याच्यातुन मुक्त झालेले आहेत. सभापती येथे आज बोलत आहेत की हे सर्व आमच्यावर येणार. परंतु प्रशासनाने आम्हाला वेळेवर आपल्या अडचणी आहेत त्या दाखवल्या तर आम्ही मार्ग काढायला तयार आहोत. त्याला स्थायी समितीच्या सदस्यांची किंवा सभापती साहेबांचा त्याला कुठे विरोध आहे. तुम्ही तसे गोषवाऱ्यामध्ये आणायला पाहिजे होते आणि तिथे आता जे काही अडचणी येतील ते निरसन करण्याचे प्रशासनाचे काम आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महासभेच्या ठरावाचे काय झाले हे आम्हाला माहिती नाही आहे.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, मिलन म्हात्रे साहेब बोलतात ते बरोबर आहे की, मा. महासभेत काय झाले ते स्थायी समितीला माहिती पडायला पाहिजे. मग ते तुम्ही गोषवाऱ्यामध्ये प्रशासनाने उल्लेख करायला पाहिजे. ह्या नगरसेवकाने ठराव मांडला आणि त्यांनी आम्हाला सही दिली नाही म्हणून आम्ही हे विषय येथे आणला असे तुम्ही गोषवाऱ्यामध्ये द्या.

**दिनेश नलावडे :-**

आज आपण त्यांच्या सहीची अडचण सभागृहाला माहिती पडते. त्याच्याबद्दल कुठे कुणाला काय माहिती होती. आज विषय आला आणि माहिती पडले की सही केली नाही.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, आपण आता याठिकाणी सांगितले की आपण आता मोकळे झालो. पण आपण आता मोकळे झालो नाही. जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने आपल्याला सांगितले की, ३१ डिसेंबर पर्यंत घनकचरा प्रकरणासंदर्भात आपण निर्णय घ्या. तर आपण त्याची अंमलबजावणी सहा महिन्यापूर्वीच चालू केली. मा. महासभेमध्ये रितसर विषय आला. विषयपटलावर विषय आला आणि तो मंजूर झाला आणि त्याच्यानंतर आपण त्याठिकाणी जाण्यासाठी रस्ता नव्हता तर त्या रस्त्यासाठी आपण टेंडर काढले आणि रस्त्याची आपली प्रक्रिया सुरू झाली. त्याच्यानंतर हा पुन्हा विषय आला भिंत बांधणे. याठिकाणी आपण कुंपण बांधायला परवानगी देत आहोत. तर त्याचे ही टेंडर निघेल ना. म्हणजे ह्याच्या अगोदरच्या सगळया प्रक्रिया पुर्ण झालेल्या आहेत. तर असे म्हणता येणार नाही की, मा. महासभेने किंवा सन्मा. सदस्यांनी घनकचरा व्यवस्थापनेला विरोध केलेला आहे. असे होउ शकत नाही. यापुढच्या ज्या सगळया मागच्या प्रक्रिया आहेत त्यापूर्ण झालेल्या आहेत आणि त्याच्या पुढची ही स्टेप आहे कुंपन, भिंत बांधायला. त्यामुळे ह्याठिकाणी सभापती साहेब, लोकप्रतिनिधींची जी जबाबदारी आहे याठिकाणी ती पूर्णपणे संपलेली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही सुरू केलेली आहे. आता हा आजचा विषय आलेला आहे त्या ठिकाणी त्या जागेत कुंपण भिंत बांधण्यासाठी आणि त्याला मंजुरी आपण देत आहोत.

**मोहन पाटील :-**

प्रदुषण मंडळाने परवानगी का दिली नाही त्याचा आपण फॉलअप केला आहे का?

**आसिफ शेख :-**

आणि अजूनही जसे सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे, रिटाजी शाह ह्यांनी सांगितलेले आहे त्याचा खुलासा अजून झालेला नाही आहे. जर सन्मा. सदस्य सुचक आणि अनुमोदनाने सही केली नाही तर काय होईल.

**मोहन पाटील** :-

प्रशासनाने प्रदुषण मंडळाची परवानगी घेतली काय?

**रिटा शाह :-**

साहेब असा विषय आणलेला आहे की, लग्न लागलेला आहे. पण मुलगा आणि मुलगीच नाही आहे. आपल्याकडे घनकचरा प्रकल्प आपल्याकडे सॅक्शन नाही तर आपण कुंपण भिंत बांधणार कुठे? तुमचा जो प्रकल्प आहे तोच सॅक्शन झालेला नाही आहे. त्या ठरावावर अजून सही नाही आणि तुम्ही कुठे लग्न लावणार आणि हॉल खरेदी करणार?

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, मा. महासभे मे जो बात हुई उसवक्त आयुक्त साहेब ने क्या कहा था, कि ३१ डिसेंबर तक अपना सब विषय चालू है । और उसकी प्रक्रिया दुसरे डंपिंग ग्राउंड मे चालू है । डॉक्टर साहब ने भी कहा था कि, उसकी प्रक्रिया चालू हो गई है, इसलिए अपने पर नगरसेवकपर कुछ भी तकलीफ आने वाली नही है । ऐसा उन्होंने अपनेको आश्वासन दिया था । और भिंवडी, थाना महानगरपालिकेसे बात करके हम दो-चार दिन मे इनफॉरमेशन करेंगे । वो उन्होंने किया नही । अगर आयुक्त साहब ने म्हात्रे साहब को बोला की, हमारा विषय खतम हो गया नगरसेवक जानो तो वो गलत बोल रहे है । ऐसा आयुक्त साहब को नही बोलना चाहिए । उन्होंने खुदने बोला था हम पुरी रिपोर्ट देंगे और जहॉ पे सुविधा होगी वहॉ पे करेंगे । फिर सर्व समंती से प्रस्ताव पास हुआ । जो लोगो ने प्रस्ताव पास करके सही नही कर रहे है, उन्हके उपर प्रशासन क्या कार्यवाही करनेको है वो उन्होको करनेका है । हमने तो सभे मे सर्व संमती से पास किया है । और जो कुंपन बांधनेका है वह आप उस जगह पर बांध सकते है ।

**मिलन म्हात्रे :-**

सभेत अशी चर्चा झाली की, हा प्रकल्प भिंवडीला होणार आहे, हा प्रकल्प ठाण्याच्या जवळ होणार आहे. हा प्रकल्प कुठे झालेला आहे का? त्याला कुठे मंजुरी मिळाली आहे का? असे काम कुठे झाले आहे का, नाहीतर आपण आम्हाला सांगाल की येथे होणार आहे तिथे होणार आणि आमच्याकडे होणार नाही. आपण आम्हाला सरळस्पष्ट सांगा की ठाणेने नाही म्हणून सांगितले आहे. भिंवडीमध्ये होणार नाही. गावकऱ्यांनी स्टे आणलेला आहे. आपण आम्हाला हे क्लिअर करा. अशा जमलिंगमुळे तो ठराव तिथे वायपाउट झाला. मा. महासभेमध्ये आम्हाला ही कळले नाही की, काय चालले आहे.

**दिनेश नलावडे :-**

केळकर साहेब सहा महिन्यापासून प्रशासनाकडून आम्हाला व्यवस्थित मार्गदर्शन होत नाही आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, प्रशासनाची भुमिका क्या है, करनेका है या नही करनेका है । अभी जो प्रस्ताव लाया है तो जमीन अपनेको मिला है तो उसको सुरक्षित करनेका वो ही काम करेंगे लेकीन जो घनकचरेका प्रस्ताव है उसका क्या हुआ । आप जरा हमको इसबारे मे सविस्तर बताईये.

**रिटा शाह :-**

सभापती साहेब, आपल्या खुलाशाच्या अगोदर मी सांगते, आज आपल्याकडे हा विषय आणायला मजबुर केला आहे कि काहीतरी आपल्याला भिती दाखविली आहे ते खोटे आहे. कारण हा विषय जो आहे तो नगरपरिषद होती तेव्हा स्थायी समितीमध्ये पास झालेला आहे. स्थायी समितीमध्ये शिफारस झालेली आहे. त्यानंतर तो मा. महासभेत आलेला आहे. मग परत स्थायी समितीमध्ये आणण्याचा प्रश्नच येत नाही. कारण तेव्हा ही मी नगरसेविका होती आणि आता ही मी नगरसेविका आहे. तेव्ह ही आम्ही पास करून दिले आहे आणि आज ही आम्ही पास करुन दिलेले आहे. आम्ही लग्न लावून दिले आहे आणि आता मुलगा मुलगी पळून गेले तर त्याच्याशी आमचे काही घेणदेणंच नाही. त्यांना शोधायचे काम प्रशासनाचे आहे. तुम्ही त्यांना शोधून आणा.

**मोहन पाटील :-**

जर त्याने ठरावावर सही केली नाही. उपआयुक्त साहेब त्यांनी ठरावावर सही केली नाही ही गोष्ट मानतो मी, पण टेपिंगमध्ये आपल्याकडे सदुढ दृष्टया पुरावे आपल्याकडे आहेत. हे पुरावे ग्राह्य धरले जाणार नाहीत का? मग आपण ह्याच्यापुढे सभागृहामध्ये टेपिंग ठेवू नका. मग तुम्ही ह्याच्यापुढे हा खर्च करू नका, हा खर्च बंद करा असे मला बोलायचे आहे. ते जर पुरावे तुम्ही ग्राह्य धरत नसाल तर आपल्याला टेपिंग नाही पाहिजे.

**मा. सभापती :-**

आपल्याला इतिवृत्तांत द्यायचे आहे म्हणून आपल्याला टेपिंग ठेवावे लागणार.

**मोहन पाटील :-**

त्याकरिता आपण स्टेनो आणलेले आहे. आता दोन स्टेनो आहेत हवे असल्यास आपण चार स्टेनो करू. त्या दिवशी सभा सुरू होणार ती सभा अर्धा तास खोलंबिली कारण माईक चालू नव्हते.

**रिटा शाह :-**

मोहन पाटील साहेब, बोलतात ते ठिक आहे. माझे असे बोलणे आहे की टेपिंग करतात तर त्याच्या सोबत व्हिडीयो शुटींगदेखील करा. मग कोण काय बोलते ते बरोबर दिसेल.

**मोहन पाटील :-**

दुसरा विषय असा आहे की, सभापती महोदयांनी आपल्याला सांगितले की, आपल्याला ह्याची भिती वाटते.

**मा. सभापती :-**

मला भीती वाटत नाही. तुम्हाला विषय मंजुर करायचा असेल तर करा नाहीतर आता ही सांगा की नामंजूर. माझा मी प्रस्ताव आपल्यासमोर ठेवलेला आहे.

**मोहन पाटील :-**

आपण प्रस्ताव नामंजूर केला नाही. आपण जो गोषवारा दिला प्रशासनाने आणि सन्मा. आयुक्त साहेबांनी या टिपणीमध्ये असे लिहून द्यायला पाहिजे होते की सो ॲण्ड सो दिनांकाला मा. महासभा झाली आणि त्या महासभेमध्ये अशा अशापद्धतीने ह्या नगरसवेकांनी सुचक आणि अनुमोदनाने ठराव मांडला होता. त्या ठरावावर त्यांची सही झालेली नाही आहे. तरी कृपया या विषयावर सभागृहामध्ये चर्चा व्हावी आणि सभेत चर्चा करून आपण निर्णय घ्यावा. अशापद्धतीची एक टिपणी द्यायला पाहिजे होती.

**आसिफ शेख :-**

याठिकाणी सन्मा. सदस्य मोहनजी पाटील ह्यांनी ठराव मांडलेला आहे त्याला अनुमोदन सन्मा. सदस्य याकुब कुरेशीजी ह्यांनी दिलेले आहे. त्या ठरावामध्ये थोडीशी दुरूस्ती मी अशी सुचवू इच्छितो.

**(सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी दुरूस्तीसह ठरावाचे वाचन केले.)**

**रिटा शाह :-**

साहेब, आसिफ शेख ह्यांनी जो ठराव वाचून दाखविला तो ठराव आम्हालाही मान्य आहे. पण तुम्ही नेमके कुंपण भिंत बांधणार कुठे आहे. तुमच्याकडे सर्वे नंबर कुठे आहे. आपण ठरावामध्ये आणि गोषवाऱ्यामध्ये सर्वे नंबर नमुद करा नाहीतर ते मला मंजुर नाही आहे. माझे त्याला विरोध आहे. टिपणीमध्ये सर्वे नंबर द्या आणि ठरावात पण नमुद करा तरच मला ते मंजुर आहे. आपण बोलणार कुठे आणि कुंपण भिंत बांधणार कुठे. तसा विषय व्हायला नाही पाहिजे.

**मोहन पाटील :-**

सचिव साहेब, आपल्याकडे असे बऱ्याचशा गोष्टी झाल्या होत्या. आपल्याकडे काही कागदपत्रे येतात कारण आपण गोषवारा देताना ते जरा बघावे कारण आपल्याकडे संपूर्ण असे तयार आहे घनकचरा प्रकल्प कुठे उभा राहणार आहे. हे ज्ञान आपल्याला आहे आणि नगरसेवकांना ही त्याचे ज्ञान आहे. परंतु ते रेकॉडली घ्यायला पाहिजे. आपल्याकडे एकदा गोषवारा आला की, कृपया त्याचे वाचन करून आपण सभागृहापुढे ठेवावे.

**सत्यवान धनेगावे :-**

घनकचरा प्रकल्पाची जागा ही मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मौजे पाली व उत्तन येथील सर्वे क्र. ६५ व सर्वे क्र. २५ याठिकाणी असून त्याजागेचे एकूण क्षेत्र ३१.४६ हेक्टर आहे.

**डॉ. बावस्कर :-**

सभापती साहेब, सर्वे क्र. ६५, १० हेक्टर ७२ आर व सर्वे नं. २५ क्षेत्र २० हेक्टर ७४ आर असे एकूण ३१.४६ आर ही शासकीय जमीन ह्या प्रकल्पासाठी शासनाने महानगरपालिकेस दिलेली आहे. त्यातून चार हजार दोनशे अठ्ठयान्नव हे अंदाजित क्षेत्र ज्या ठिकाणी आता वस्ती आहे आणि एक विहीर आहे ती दहा चौरस मीटर क्षेत्र वगळून ती जमीन आपल्याला दिलेली आहे. चार हजार दोनशे अठ्ठयान्नव चौरस मीटरचे रहिवाशी क्षेत्र ते झोपड्यांचे अतिक्रमण क्षेत्र आणि दहा चौरस मीटर अंदाजे विहीरीचे क्षेत्र वगळून उर्वरित क्षेत्र मिरा भाईंदर महानगरपालिकेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प यासार्वजनिक प्रयोजनासह मंजूर करण्यात आलेला आहे.

**मोहन पाटील :-**

पर्यावरण प्रदुषण विभागाने यावर काय उत्तर दिले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे पझेशन मिळाले आहे त्याच्यामध्ये अतिक्रमण आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

आपल्याकडे पझेशन मिळाले आहे त्याच्यात सध्या एकही अतिक्रमण नाही. मा. सभापती महोदय, सदर जागेवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून ॲथोरायजेशन मिळण्यासाठी महानगरपालिकेने डिसेंबर २००१ आणि जानेवारी २००३ मध्ये अर्ज केलेला आहे. त्यानंतर वेळोवेळी यासाठी पाठपुरावा करण्यात आला. प्रदुषण नियंत्रण मंडळ आणि ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट यांनी वेळोवेळी ज्या गाईडलाईन्य दिलेल्या आहेत त्या गाईडलाईन्स नुसार आपण प्रत्येकवेळी त्यांना माहिती पुरविलेली आहे. त्यामध्ये त्या जागेवर जो एअर सर्वे आहे. म्हणजे गॅसेस वगैरेचा त्याचा सर्वे प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून पुर्ण त्यांनी मार्चमध्ये आपल्या विभागात स्वतः येउन कम्पलिट केले आहे. अंडरग्राउंड वॉटर सर्वे चे आपण कम्पलिशन केलेले आहे आणि त्यांनी ज्या स्टेप दिलेल्या आहेत त्यासाठी जी जी माहिती आवश्यक आहे ती संपूर्ण माहिती आपण प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिलेली आहे. यासंबंधी वारंवार प्रदुषण नियंत्रण मंडळाचे जे रिझनल ऑफीसर आहेत देशपांडे यांच्याशी मी संपर्कात आहे आणि आपण शेवटची माहिती शेवटची कम्पलाईन्स यासाठी त्यांचे जे पुन्हा पुन्हा कम्पलाईन्स करावे लागते. त्यामध्ये ५.१२.२००३ रोजी महानगरपालिकेकडून कम्पलाईन्स ऑफ म्युनिसिपल सॉलीडवेस्ट हे त्यांच्या २७.११.२००३ च्या पत्रानुसार आपण कम्पलाईन्स केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी पुन्हा काही प्रश्न उपस्थित केले आहे. त्याचे उत्तर आपण त्यांना सविस्तर दिलेले आहेत. यानंतर त्याच्या पुढच्या आठवड्यात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष मा. मुस्ताक अंतुले साहेब यांची भेट घेउन त्यावेळी मा. आयुक्त आणि मी आणि ठाणे विभागाचे रिझनल ऑफीसर देशपांडे साहेब आम्ही सगळेजण त्या ठिकाणी होतो आणि याजागेवर आम्हाला परवानगी देण्यात यावी, ॲथोरायझेशन देण्यात यावे आम्ही सर्व बाबींची पुर्तता केलेली आहे आणि ज्या काही अडचणी असतील त्यासाठी आम्ही आपल्याला लिहून देतो की, ज्या ही गोष्टी आपल्या असतील त्या आम्ही पुर्तता करू त्यासाठी आमच्याकडून ॲफिडेव्हीट आम्ही द्यायला तयार आहोत. आपण दर दोन महिन्यांनी, सहा महिन्यांनी पाहिजे तर यासाठी मॉनीटरींग करा, याचे ऑब्जरवेशन आपल्याकडून ठेवा. परंतु आम्हाला यासंबंधी परवानगी देण्यात यावी. याठिकाणी मा. चेअरमन साहेबांनी अतिशय चांगल्याप्रकारे समजावून घेतले आणि त्यांनी सांगितले की, या विषयाचे तुमचे पत्र आमच्याकडे मिळालेले आहे. याच्यावर आम्ही अभ्यास करून जिल्हाधिकाऱ्याकडे जी कमिटी निर्माण केलेली आहे. त्या कमिटीकडे आम्ही हे पत्र पाठवतो आणि तुमच्या पत्रावर लवकरात लवकर आम्ही विचार करण्यासाठी कार्यवाही करण्यासाठी घेतलेले आहे आणि काही दिवसातच त्यावर निर्णय घेण्यात येईल. असे श्री. अंतुले साहेबांनी त्या दिवशी आम्हाला त्याठिकाणी सांगण्यात आले. त्यानंतर मी पुन्हा श्री. देशपांडे साहेब यांच्याकडे फॉलअप केला आणि त्यांनी सांगितले की, त्यांनी जिल्हाधिकाऱ्याकडे हे पत्र आमची मिटींग झाल्यानंतर लगेच पाठवलेले आहे. जिल्हाधिकाऱ्याकडे फॉलअप चालू आहे आणि प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून सुद्धा फॉलअप त्यांनी आपण पुर्ण जवळ जवळ कम्पलाईन्स केलेले आहे. ज्या गाईड लाईन दिलेल्या आहेत ज्या चेक लिस्ट दिलेल्या आहेत त्यानुसार आपण सगळी माहिती त्यांना पुरवलेली आहे. आपण प्रदुषण नियत्रंण मंडळाकडून परवानगीची वाट पाहत आहोत आणि काही दिवसातच आपल्याला ही परवानगी मिळू शकेल. अशी एक आशा वाटते. त्यात बरेचसे असे मुद्‌दे होते. त्यानंतर आपण कुठली टेकनॉलिजी वापरणार आहोत, कशाप्रकारचा प्रकल्प उभारणार आहोत

याबद्दलची सविस्तर टिपणी मा. महासभेमध्ये दिली होती आणि मा. महासभेमध्य याच जागे विषयाची आपण फक्त टिपणी दिलेली आहे. त्यामध्ये कुठलेही पर्याय सुचविण्यात आलेले नव्हते किंवा इतर दुसरी कुठलीही जागा आपण मा. महासभेमध्ये जो गोषवारा प्रशासनाकडून देण्यात आलेला होता त्यामध्ये स्पष्ट नमुद केलेले होते.

**याकुब कुरेशी :-**

माझ्या माहिती अनुसार डॉक्टर साहेबांनी बराच खुलासा दिलेला आहे आणि आपण एवढा पाठपुरावा केलेला असून मला वाटत नाही की, सर्वोच्च न्यायालयाचा आपण कुठे अपमान करत आहोत किंवा आपण कुठे उल्लंघन करत आहोत असे मला तरी वाटत नाही. म्हणूनच सभापती महोदय, आपल्याला सांगू इच्छितोय आपल्याला घाबरण्याची काही गरज नाही. आपण आपल्या तर्फे सगळा पाठपुरावा केलेला आहे.

**मोहन पाटील :-**

घनकचरा व्यवस्थे प्रमाणे आपण कशापद्धतीचा आरोग्याचा ठराव केला. कचरा वेगवेगळा घ्यायचा. सुका कचरा आणि त्याला गाड्या, कचरा कुंडी मुक्त अशापद्धतीची आपण प्रोसेस आपण सुरू केलेली आहे आणि मागच्या वेळेला ह्याच नगरपालिकेच्या स्थायी समितीमध्ये पदसिद्ध अध्यक्ष, नगराध्यक्ष म्हणून सन्मा. प्रफुल्ल पाटील होते त्यांनी हा विषय आणला होता घनकचरा प्रकल्प व्यवस्थापनेला त्यांनी मंजूरी दिलेली आहे मागच्या स्थायीसमिती मध्ये. आपण मागचा रेकॉर्ड काढावा त्यावेळेला अशी विचारणा झालेली होती की, अधिकाऱ्यांनी आम्हाला जी अशी शिक्षा दिलेली आहे की, तुमचे सभागृह कॅन्सल होउ शकते, नगरसेवकांवर कार्यवाही होउ शकते. अशापद्धतीचा विचार या स्थायी समितीमध्ये त्यांनी मांडला होता. याला संपुर्णपणे जबाबदार नगरसेवक नाही तर अधिकारी सुद्धा आहेत. असे त्यांचे बोलणे होते आणि त्यावेळेला हा विषय तात्कालिन नगरपालिकामध्ये हा विषय मंजुर झालेला आहे. त्यावेळेला ते अध्यक्ष होते आणि तुम्ही आता त्या ठरावावर सही केली नाही केली तो विषय नंतरचा आहे. म्हणजे आपण हा ठराव केलेला नाही. समितीला ठराव पाहिजे आणि ठरावासाठी आपण थांबलो हा विषय नाही. मग उपआयुक्त साहेब स्थायी समितीने ठराव न करता आपण काम सुरू कसे केले. तुम्ही जागा कोणत्या आशयाने मागितली ती जागा आपल्याला पाहिजे. कोणत्या ह्याने आपण ट्रक्स वाढवले, कोणत्या ह्याने आपण कचरा वेगळा करायचा केला. आपण घनकचरा प्रकल्पाच्या व्यवस्थेच्याअधिन राहून आपण सगळी यंत्रणा सुरू केली आहे. त्याकरिता आपण जागेची मागणी केली आहे. म्हणजे सभापती महोदय, आपण कुठे बांधलेलो आहोत हा विषय नाही आहे. आपण संपूर्णपणे ह्यांना परमीशन दिलेली आहे. आपण मागचा तत्कालिन नगरपालिकेचा ठराव कॅन्सल केला नाही. रेकॉर्डला आणा जर कॅन्सल केला असेल तर आपण तो ठराव पुन्हा मांडू. आपण तो ठराव केलेला आहे आणि आता यावेळेला अशापद्धतीने रितसर ठराव केलेला आहे. त्या ठरावाचे वाचन सन्मा. सदस्य आसिफ शेख ह्यांनी करावे.

**आसिफ शेख :-**

सन्मा.सदस्य मोहनजी पाटील यांनी जो ठराव मांडलेला आहे व त्यास सन्मा. सदस्य याकुब कुरेशीजी यांनी अनुमोदन दिलेले आहे. त्या ठरावाचे वाचन करण्याची जबाबदारी सन्मा. सुचक श्री. मोहनजी पाटील यांनी दिलेली आहे आणि त्यानुसार सभापती साहेब यांच्या परवानगीने मी ठराव या ठिकाणी वाचत आहे.

**(ठरावाचे वाचन केले.)**

**रिटा शाह :-**

ठराव झाला आहे सर्व काय ते आहे. या ठरावामध्ये त्यांनी सांगितले की, या ठरावामध्ये सही नाही. त्या ठरावामध्ये तुम्ही नाव तरी नमुद करा. कोणाची सही नाही कोणाचे अनुमोदन नाही. अनुमोदनवर सही आहे का, ते पण सही देत नाहीत. सुचनामध्ये तुम्ही नाव तरी घ्या. आपण असेच मोघम सांगणार की, ह्यांनी सही केली नाही त्यांनी सही केली नाही. तर सुचना कोणी केली, अनुमोदन कोणी केले. नाव लिहायला भिती वाटते का? तुम्ही ठरावामध्ये नाहीतर त्या गोषवाऱ्यामध्ये नाव टाका. नाहीतर प्रशासनाने जे उत्तर दिले आहे त्याच्यामध्ये तुम्ही नाव डिक्लर करा की तुम्हाला कोण सही देत नाही. हे मुद्दामहून कुठलाही विषय घेउन हे असे काढायचे आणि नगरसेवकाला वाटते की, उद्या आमचे पद जाते. हे असे करायचे चुकीचे आहे. म्हणून तुम्ही नाव डिक्लर करा. यापुढे कुठलाही नगरसेवक

ठराव मांडून सही करायला अशी नाटक करणार नाही. शेवटी प्रशासन आणि शासन दोघांनाही सोसायचे असते. म्हणून तुम्ही ह्याच्यामध्ये नावं टाका. नाहीतर हा ठराव मला मंजुर नाही आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सुचक - प्रफुल्ल पाटील आणि अनुमोदन - शशिकांत भोईर आहेत.

**रिटा शाह :-**

मला माहित आहे त्याप्रमाणे घनकचरा हा विषय स्थायी समितीमध्ये ही आला होता नगरपरिषद असताना आणि मा. महासभेतदेखील आला होता. त्यानंतर नगरभवनमध्ये सॉलीडवेस्ट मॅनेजमेंटवर सर्व डॉक्टरांना बोलावून त्याच्यावर क्रार्यक्रम ही सादर झाला होता.

**दिनेश नलावडे :-**

आता जे महाराष्ट्र प्रदुषण मंडळाने आपल्याला परवानगी दिलेली नाही आहे. त्याचे कारण काय? आपण त्यांच्याकडे काय पुर्तता केली नाही का? ते आपल्याला केव्हापर्यंत परवानगी देणार आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती साहेब आणि उपस्थित सभागृह सदस्य सुप्रीम कोर्टाचा निर्णय केवळ भाईंदर नगरपालिकेलाच नव्हे तर देशातील जे जे ॲथोरिटी त्यामध्ये आहेत. एम.जे.पी. ला सुद्धा महाराष्ट्र प्रदुषण मंडळ आहे. त्याला सुद्धा लिमिटेशन आहे. अमुक मुदतीत त्यांनी मंजुरी द्यायला पाहिजे. ही केवळ आपली जबाबदारी नाही. आपण ठराव केला आपण जागा ताब्यात घेतली. जिल्हाधिका-यांना ३१ डिसेंबरच्या आत जागा द्यायची होती आणि ३१ डिसेंबर, २००१ च्या आत त्यांनी आपल्याकडे जागा दिली. नगरपालिकेने सुद्धा ठराव करून कार्यवाही केली आणि प्रस्ताव पाठविला. म्हणजे आपल्याकडून झालेली कार्यवाही ही पूर्णपणे झालेली आहे. आता महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडून आपल्याला मान्यता प्राप्त झाल्यानंतर तात्काळ त्या जागेवर आपण प्रकल्प राबवू शकतो. तर त्यामध्ये कोणतीही अडचण येत नाही. महाराष्ट्र प्रदुषण मंडळाकडून परवानगी लवकरात लवकर प्राप्त करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे आणि त्यांना सर्व त-हेची माहिती आपल्या महापालिकेकडून देण्यात आलेली आहे.

**नितीन ठाकूर :-**

उपआयुक्त साहेब, आपल्या स्थायी समितीला प्रशासकीय किंवा आर्थिक मंजुरीचे अधिकार आहेत का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

शिफारस करण्याचे अधिकार आहे.

**रिटा शाह :-**

अध्यक्ष महोदय, आता केळकर साहेबांनी सांगितले की, प्रकल्प आपल्याकडे केव्हापासून सुरू झालेला आहे. त्याची मंजुरी स्थायी समिती आणि मा. महासभेत नगरपरिषद असताना मिळालेली आहे. मग ती मंजुरी परत मा. महासभेत आणायचे प्रयोजन काय होते आणि मा. महासभेत आणल्यानंतर सुचक आणि अनुमोदन सही करत नाही. मग त्याचे आयोजन काय? सभापती साहेब, आता केळकर साहेबांनी डिक्लर केले की, आपल्याकडे ऑलरेडी विषय मंजुर आहेत स्थायी समिती आणि मा. महासभेत. मा. महासभेत विषय मंजुर असताना आणि महानगरपालिका झाल्यानंतर ही आपण मा. महासभेत तो विषय आणला. तो विषय आणल्यानंतर त्याची सुचना ही झाली आणि अनुमोदनही झाले. मग आता असे बोलण्याचे अर्थ आहे की, जे पुर्वी झालेले होते म्हणून आता गरज नाही. मग आता गरज नव्हती तर मा. महासभेत विषय आणण्याची गरज काय होती? आणि मा. महासभेत आणल्यानंतर माजी नगराध्यक्ष आपण हे लक्षात ठेवा ते माजी नगराध्यक्ष आहेत. ते कायद्याचे वाचन करतात आणि आपल्याला कायद्याची भितीपण दाखवतात. मग त्यांनी कुठे सही केली नाही आणि सही का करत नाही? कारण त्यांना त्यात काही कायद्याची अडचण वाटते का? कायद्याची भिती वाटते का? हे आपण त्यांना विचारले का? कारण मा. महासभेत हा विषय त्यांनी मांडून सुद्धा दोन तास ते बोलले आणि दोन तास सभापती साहेब आपण ते लेक्चर ऐकले ते आम्ही ही ऐकले आणि तुम्ही ही ऐकले. आपल्याकडे कॅसेटमध्ये ते त्यांचे व्याख्यान बंद आहे. मग ते बंद व्याख्यान आपल्याकडे असूनसुद्धा ते सही करत नाही. ते भित आहेत का, त्याच्यावर सही करायला. ते भितात ते माजी नगराध्यक्ष होते. त्यांना कायद्याचे चांगले ज्ञान आहे. मग ते भितात तर आपण ही घाबरायला पाहिजे. त्याचा अर्थ असा

झालेला आहे. आपण ऐंशी लाखाचा खर्च मंजूर करतोय, स्थायी समितीवर आम्ही सदस्य आहोत आणि उद्या हे काही स्थायी समितीवर यायला नाही पाहिजे. आम्ही शिफारस केलेले आहे मग मागच्या शिफारशीचे काय झाले?

**प्रकरण क्र. १९० :-**

घनकचरा व्यवस्थापनासाठी मिळालेल्या जागेत कुंपण भिंत बांधणे कामाबाबत विचार विनिमय करणे.

**ठराव क्र. १७१ :-**

imara¹Baa[-Mdr mahanagarpailaka h_ImaQyao Ganakcara p`klpasaazI maa. ijalhaiQakarI¸ zaNao yaaMcaokDUna sa.na.65 va 25 maaOjao ]<ana va palaI xao~ 31.46 ho@Tr jamaIna mahanagarpailakokDo hstaMtr JaalaolaI Aaho. maa. savaao-cca nyaayaalayaacyaa AadoSaanausaar yaapUvaI-ca maa. mahasaBaonao Ganakcara vyavasqaapna p`iËyaa tatDInao sau$ vhavao yaakrIta savaa-naumato zrava maMjaUr kolaolaa Aaho. tsaoca sadr jaagaot jaaNaosaazI rsta tyaar krNaosaazI irtsar inaivada kaZUna AMmalabajaavaNaI doKIla sau$ca Aaho. prMtU maa. mahasaBaot Jaalaolyaa zravaavar AVapI saucak EaI.p`fulla paTIla va Anaumaaodk EaI.SaSaIkaMt Baao[-r yaaMcaoSaI vaarMvaar ivanaMtI va cacaa- k$nahI %yaa daoGaaMnaIhI sadr zravaavar sahI kolaolaI nasalyaanao p`Saasanaacyaa vatInao Aajacyaa maa.sqaayaI saimatIpuZo saaMgaNyaat Aalao Aahot. hI baaba kayadoSaIrir%yaa gaMBaIr Aaho. tqaapI ]prao@t maa. mahasaBaot Jaalaolyaa zravaacaI AMmalabajaavaNaI maa. savaao-cca nyaayaalayaacao AadoSaanao sau$ Aaho Asao gaRhIt Qa$na yaqaaoicat kaya-vaahI sau$ Aaho. sadr jaagaovar AitËmaNa hao} nayao mhNaUna kuMpNa iBaMt baaMQaNao AavaSyak Aaho. kuMpNa iBaMt baaMQaNao kamaacao r@kma $.80.81 laxa evaZyaa rkmaocao AMdajap~k tyaar krNyaat Aalaolao Aaho. sadr jaagaovar Ganakcara p`klp ]BaarNao kamaI maharaYT/ p`duYaNa inayaM~Na maMDLacaI prvaanagaI imaLalaolaI naahI. prMtU sadr jaagaovar AitËmaNa hao} nayao yaa krIta kuMpNa iBaMt baaMQaNao AavaSyak Aaho. trI sadr Ganakcara p`klpakrIta imaLalaolyaa jaagaosa kuMpNa iBaMt baaMQaNao kamaI tyaar krNyaat Aalaolyaa $pyao 80.81 laxa rkmaocyaa AMdajap~kasa p`SaasakIya va AaqaI-k maMjaUrI doNyaakrIta maa. mahasaBaot zovaNaosa yaa zravaavdaro iSafarsa krNyaat yaot Aaho.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सवार्नुमते मंजूर**

**सही/-**

**मा. सभापती,**

**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून ही सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ठिक १२.३० वा.**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**